# कृषी व कृषी संलग्न विभागाच्या पदवी प्रवेशा करता जागेवर प्रवेश फेरी वेळापत्रक जाहीर.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी , जैवतंत्रज्ञान व इतर कृषीसंलग्न विषयाच्या पदवी प्रवेशाच्या चारही ऑनलाइन प्रवेश फेऱ्या आटोपल्या आहेत. यावर्षी कृषी विभागाच्या अधिसूचनेनुसार जागेवरील प्रवेश फेरी ची कार्यपद्धती सुधारित करण्यात आलेली आहे. या कार्यपद्धतीचे वेळापत्रक आयुक्त राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष महाराष्ट्र शासन यांनी जाहीर केलेले आहे. ऑनलाइन प्रवेश फेऱ्यानंतर रिक्त असलेल्या जागांच्या तपशील ,अंतिम प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणांचा तपशील तसेच जागेवरील प्रवेश फेरी करिता पात्र उमेदवारांच्या गुणवत्ता यादी दिनांक २४ /०३/ २०२१ ला सायंकाळी ५.३०नंतर संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. दिनांक २६ ते २८ मार्च २०२१ ला विद्यार्थ्यांना ज्या विद्याशाखेत प्रवेश घ्यावयाचा आहे त्या महाविद्यालयाच्या ठिकाणी प्रवेश फेरी होणार असून दिनांक २८ मार्चला जागांच्या रूपांतरासह प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद दिनांक ला आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे, शुल्कासह सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत उपस्थित रहावयाचे आहे. यानंतर संबंधित महाविद्यालय गुणवत्ता यादी तयार करून दुपारी २ वाजेपर्यंत प्रसिद्ध करणार आहे प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांच्या उपस्थिती नुसार गुणवत्ता यादी प्रसिद्ध होईल त्यानुसार पात्र उमेदवारांची प्रवेश होणार आहे. यावर्षी ही पद्धत नव्यानेच राबवण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात संपर्क साधून विस्तृत माहिती जाणून घ्यावी असे आव्हान राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया कक्षा तर्फे करण्यात आले आहे.

जैवतंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी श्री.शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती, येथे प्रत्यक्ष भेट देऊन किंवा प्रवेश प्रक्रिया प्रभारी श्री धीरज कदम मोबाईल नंबर ९७१८७६९०७८ यांच्याशी संपर्क करावा, अशी माहिती प्राचार्या कु. दिपाली भारसाकळे यांच्यातर्फे देण्यात आली आहे.

प्रति,
संपादक,
दैनिक ------------------------------

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती

प्राचार्या,
श्री शिवाजी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,
अमरावती

Scanned with CamScanner